# गुगल इंडियाकडून एक हजार विद्यार्थ्यांना क्लाउड रेडी प्रशिक्षण

## भारतातील ८५ अभियांत्रिकी संस्थांच्या विद्यार्थ्यांना संधी



'गुगल क्लाउड रेडी' चे प्रमाणपत्र प्रदान करताना संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर, डॉ. शिरीष साने, अधिष्ठाता डॉ. सुनील कुटे.

**प्रतिनिधी** | नाशिक

आजच्या स्मार्ट तंत्रज्ञानाच्या काळात क्लाऊड कॉम्प्युटिंग, मशीन लर्निंग, बिग डेटा तसेच आर्टिफिशियल इंटेलिजन्स या टेक्नॉलॉजीला मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. गुगल इंडियाकडून विद्यार्थ्यांना गुगल क्लाऊड रेडी फॅसिलिटेटर या कार्यशाळेद्वारे प्रशिक्षण देण्यात आले. या कार्यशाळेसाठी भारतातील केवळ ८५ संस्थांची निवड करण्यात आली होती. यामध्ये नाशिकच्या के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाचा समावेश होता. एक हजार विद्यार्थ्यांना या प्रशिक्षण कार्यशाळेत सहभाग घेतला. के. के. वाघने क्विक्लॅबवरील २८००० हून अधिक क्वेस्ट लॅब आणि स्किल बॅजेस हे महत्त्वपूर्ण टप्पे पूर्ण केले.

या उपक्रम अंतर्गत गुगलकडून सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. तसेच स्किल बॅजला जगभरात नोकरीच्या दृष्टीने महत्त्वाचे मानले जाते. गुगल क्लाऊडवर सराव व आयटी क्षेत्रातील क्लाऊडमध्ये असणाऱ्या करिअरच्या संधी या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात आला. क्लाऊड टेक्नॉलॉजीवर क्विक्लॅब प्लॅटफॉर्मद्वारे क्लाऊड कॉम्प्युटिं ग, मशिन लर्निंग, बिग डेटा तसेच आर्टिफिशिअल इंटेलिजन्स यांसारख्या उदयोन्मुख विषयाचे लॅब प्रॅक्टिकल हॅन्ड्सचे प्रशिक्षण विद्यार्थी ऑनलाइन पद्धतीने घेत आहेत. प्रा. कुशल बिर्ला यांच्या मार्गदर्शनाखाली अंतिम वर्षाचे विद्यार्थी तेजस सोनार व कृष्णा बोरसे हे क्लाऊडचे प्रशिक्षण देत आहेत. इन्फ्रास्ट्रक्चर, क्लाऊड-नेटिव्ह ॲप्लिकेशन डेव्हलपमेंट, बिग डेटा, सायबर सुरक्षा, ब्लॉकचेन आणि गुगल क्लाऊड व मशिन लर्निंग या तंत्रज्ञानाचा समस्या सोडवण्यासाठी वापर केला जात असल्याचे संगणक विभागाचे प्रमुख डॉ. शिरीष साने यांनी सांगितले.

# विद्यार्थ्यांकडून २८ हजार स्किल बॅजेसची निर्मिती

## वाघ महाविद्यालय : 'गुगल क्लाउड रेडी'चा टप्पा पूर्ण

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालय व 'गुगल क्लाउड' यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी नुकतीच 'गुगल क्लाउड रेडी फॅसिलिटेटर' कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेत गुगल इंडियाकडून भारतातील केवळ ८५ संस्थांची निवड केली गेली. यामध्ये समावेश असलेल्या के. के. अभियांत्रिकी महाविद्यालयाने क्विक्लॅबवरील २८ हजारांहून अधिक क्वेस्ट लॅब आणि स्किल बॅजेस पूर्ण करून महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. या उपक्रमांतर्गत मिळालेले प्रमाणपत्र आणि स्किल बॅजला जगभरात नोकरीच्या दृष्टीने महत्त्वाचे मानले जाते.

के. के. वाघ - गुगल क्लाउड समन्वयक टीमकडून या उपक्रमांतर्गत १०५० हून अधिक के. के. वाघ आणि इतर काही नोंदणीकृत संस्थांचे विद्यार्थी गुगल क्लाउड रेडीचे प्रशिक्षण घेत आहेत. क्लाउड टेक्नॉलॉजीवर क्विक्लॅब प्लॅटफॉर्मद्वारे क्लाउड कॉम्प्युटिंग, मशीन लर्निंग, बिग डेटा तसेच आर्टिफिशियल इंटेलिजन्स यासारख्या उदयोन्मुख विषयाचे लॅब प्रॅक्टिकल हॅन्ड्स ऑनलाइन पद्धतीने विद्यार्थी शिकत आहेत. गुगल क्लाउडवर सराव व आयटी क्षेत्रातील क्लाउडमध्ये असणाऱ्या करिअरच्या संधी या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात आला. प्रा. कुशल बिर्ला यांच्या मार्गदर्शनाखाली अंतिम वर्षाचे विद्यार्थी तेजस सोनार व कृष्णा बोरसे हे क्लाउडचे प्रशिक्षण देत आहेत.



**नाशिक : 'गुगल क्लाउड रेडी'चे प्रमाणपत्र प्रदान करताना संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर, विभागप्रमुख डॉ. शिरीष साने, अधिष्ठाता डॉ. सुनील कुटे आदी.**

**के के वाघ येथे आज**
**वारसा पाण्याचा ग्रंथाचे प्रकाशन**

**नाशिक : प्रतिनिधी**

के के वाघ शिक्षण संस्था, नाशिक यांच्या वतीने शनिवार, दिनांक १९ नोव्हेंबर २०२२ रोजी दुपारी ३ वाजता संस्थेच्या मध्यवर्ती कार्यालय येथील बैठक हॉल २ येथे डॉ. दि. मा. मोरे लिखित वारसा पाण्याचा या पाण्याचा संचय आणि संवर्धन ग्रंथाचे प्रकाशन करण्यात येणार आहे. संस्थेचे ॲडव्हायजरी कमिटीचे अध्यक्ष व एमकेसीएलचे सल्लागार श्री. विवेक सावंत यांच्या शुभहस्ते प्रकाशन सोहळा पार पडेल. तरी नाशिककरांनी कार्यक्रमास उपस्थिती लावावी असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

## 'वारसा पाण्याचा' ग्रंथाचे आज प्रकाशन

**नाशिक :** के. के. वाघ शिक्षण संस्थेतर्फे शनिवारी (ता.१९) दुपारी ३ वाजता संस्थेच्या मध्यवर्ती कार्यालयातील बैठक हॉल येथे डॉ. दि. मा. मोरे लिखित 'वारसा पाण्याचा' या पाण्याचा संचय आणि संवर्धन ग्रंथाचे प्रकाशन करण्यात येणार आहे. संस्थेचे ॲडव्हायसरी कमिटीचे अध्यक्ष व एमकेसीएलचे सल्लागार विवेक सावंत यांच्या हस्ते प्रकाशन सोहळा पार पडेल. नाशिककरांनी कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थिती राहावे, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

# डॉ. दि. मा. मोरे लिखीत वारसा पाण्याचा ग्रंथाचे प्रकाशन

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**




**नाशिक** – डॉ. दि. मा. मोरे लिखित वारसा पाण्याचा या ग्रंथात जलव्यवस्थापनातील ६३ आश्चर्ये व उल्लेखनीय वास्तू तसेच जल व्यवस्थापनाबाबत मौलिक सूची आहेत. या ग्रंथाचे हिंदीत भाषांतर व्हावे, अशी भावना एमकेसीएलचे मुख्य सल्लागार तथा क. का. वाघ शिक्षण संस्थेच्या सल्लागार समितीचे अध्यक्ष विवेक सावंत यांनी व्यक्त केली.

येथील क. का. वाघ शिक्षण संस्थेच्यावतीने संस्थेच्या मध्यवर्ती कार्यालयात डॉ. मोरे लिखित वारसा पाण्याचा या ग्रंथाचे प्रकाशन सावंत यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर लेखक मोरे, संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, संचालक मंडळ, सचिव प्रा. के एस बंदी, अजिंक्य वाघ, प्राचार्य डॉ. के एन नांदुरकर, प्रा. अ. रा. सूर्यवंशी, विलास शेळके, डॉ. प्राजक्ता बस्ते आदी उपस्थित होते.

यावेळी सावंत यांनी या ग्रंथाचे प्रकाशन आपल्या हस्ते होत असले, तरी या मागचे श्रेय दिवंगत बाळासाहेब वाघ यांचेच असल्याचे नमूद केले. डॉ. मोरे यांच्या या ग्रंथाचे प्रकाशन क. का. वाघ शिक्षण संस्थेने करावे, असा बाळासाहेब वाघ यांचा आग्रह होता. तो आज पूर्ण झाला. त्याचप्रकारे या ग्रंथाचे हिंदी भाषांतर व्हावे अशी भावना सावंत यांनी व्यक्त केली.

डॉ. मोरे यांनी लेखकीय मनोगतात ग्रंथाविषयी माहिती दिली. बाळासाहेब वाघ आणि वाघ शिक्षण संस्थेप्रती कृतज्ञता व्यक्त केली. बाळासाहेब वाघ यांच्या आठवणींना उजाळा दिला.

प्रास्ताविक डॉ. सुनील कुटे यांनी, सूत्रसंचालन स्वाती पवार आणि संजीव अहिरे यांनी केले.

लोकसत्ता Mon, 21 November 2022
https://epaper.loksatta.com/c/70921316

# 'वारसा पाण्याचा' ग्रंथात मौलिक सूची

## विवेक सावंत : डॉ. दि. मा. मोरे लिखित ग्रंथाचे प्रकाशन उत्साहात

सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. २० : डॉ. दि. मा. मोरे लिखित वारसा पाण्याचा ग्रंथात जलव्यवस्थापनातील ६३ आश्चर्ये व उल्लेखनीय वास्तू या जल व्यवस्थापनाबाबत मौलिक सूची आहेत. या ग्रंथाचे अनावरण माझ्या हस्ते होत असले, तरी या मागचे श्रेय बाळासाहेब वाघ यांचेच आहे. डॉ. दि. मा. मोरे लिखित वारसा पाण्याचा ग्रंथाचे के. के. वाघ शिक्षण संस्थेने प्रकाशन करावे असा बाळासाहेब वाघ यांचा आग्रह होता. तो आज माझ्या हस्ते पूर्ण झाला. त्याचप्रकारे या ग्रंथाचे हिंदी भाषांतर व्हावे, अशी अपेक्षा संस्थेचे ॲडव्हायजरी कमिटीचे अध्यक्ष व एमकेसीएलचे मुख्य सल्लागार विवेक सावंत यांनी व्यक्त केली.

के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक यांच्यातर्फे शनिवारी (ता.१९) दुपारी तीनला संस्थेच्या मध्यवर्ती कार्यालय येथे डॉ. दि. मा. मोरे लिखित 'वारसा पाण्याचा' या पाण्याचा संचय आणि संवर्धन ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. याप्रसंगी, लेखक डॉ. दि. मा. मोरे, संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, संचालक मंडळ, सचिव प्रा. के. एस. बंदी, स्माइल व स्मिर्नचे सचिव अजिंक्य वाघ, प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर, प्रा. अ. रा. सूर्यवंशी, विलास शेळके, डॉ. प्राजक्ता बस्ते आदी उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ यांचे हस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. डॉ. दि. मा. मोरे यांनी ग्रंथाविषयी माहिती दिली. बाळासाहेब वाघ यांच्या आठवणींना उजाळा दिला. प्रास्ताविक डॉ. सुनील कुटे यांनी तर सूत्रसंचालन स्वाती पवार, संजीव अहिरे यांनी केले.



नाशिक : के. के. वाघ शिक्षण संस्थेच्या आवारात 'वारसा पाण्याचा' या डॉ. दि. मा. मोरे लिखित पुस्तकाचे प्रकाशन करताना मान्यवर.

लोकमत

# 'वारसा पाण्याचा' ग्रंथाचे प्रकाशन



'वारसा पाण्याचा' पुस्तकाचे प्रकाशन करताना डॉ. के. एन. नांदुरकर, समीर वाघ, विवेक सावंत, के. एस. बंदी, डॉ. दि. मा. मोरे.

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक** : डॉ. दि. मा. मोरे लिखित 'वारसा पाण्याचा' या ग्रंथाचे शनिवारी (दि. १९) एमकेसीएलचे सल्लागार विवेक सावंत यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

के. के. वाघ शिक्षण संस्थेच्या मध्यवर्ती कार्यालयात विवेक सावंत यांच्या अध्यक्षतेखाली हा पुस्तक प्रकाशन सोहळा पार पाडला. यावेळी व्यासपीठावर लेखक डॉ. दि. मा. मोरे, संस्थचे अध्यक्ष समीर वाघ, के. एस. बंदी, अजिंक्य वाघ, प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर उपस्थित होते. प्रारंभी दीपप्रज्वलन केल्यानंतर प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर डॉ. दि. मा. मोरे यांनी मनोगत व्यक्त करताना त्यांच्या ग्रंथलेखन प्रवासाविषयी माहिती दिली. प्रास्ताविक डॉ. सुनील कुटे यांनी केले. स्वाती पवार व संजीव अहिरे यांनी सूत्रसंचालन केले.

# 'वारसा पाण्याचा' ग्रंथ प्रकाशन

**पंचवटी ।** मेरीचे माजी महासंचालक डॉ. दि. मा. मोरे लिखित वारसा



पाण्याचा या पाण्याचा संचय व संवर्धन ग्रंथाचे प्रकाशन के. के. वाघ शिक्षण संस्थेच्या कार्यालयात करण्यात आले. डॉ. दि. मा. मोरे लिखित वारसा पाण्याचा ग्रंथात जलव्यवस्थापनातील ६३ आश्चर्य व उल्लेखनीय जलवास्तू व्यवस्थापनाबाबत मौलिक माहिती आहे. लोकसंख्या वाढत आहे तसे भविष्यातील चिंता म्हणून पाण्याचे व्यवस्थापन करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन के . के. वाघ शिक्षण संस्थेचे डव्हायझरी कमिटीचे अध्यक्ष व एमकेसीएलचे मुख्य सल्लागार विवेक सावंत यांनी व्यक्त केले. याप्रसंगी व्यासपीठावर लेखक डॉ. दि. मा. मोरे, संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, संचालक मंडळ सचिव प्रा.के. एस. बंदी, स्माईल स्पिनाचचे सचिव अजिंक्य वाघ, प्रा. डॉ. के. एन. नांदुरकर, प्रा. आ. रा. सूर्यवंशी, विलास शेळके, डॉ. प्राजक्ता बस्ते तसेच विविध महाविद्यालयांचे प्राचार्य शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. प्रास्तविक डॉ. सुनील कुटे यांनी तर सूत्रसंचालन स्वाती पवार व जनसंपर्क अधिकारी संजय अहिरे यांनी केले.

# गुजरातच्या नारोला इन्फोटेकतर्फे १९ विद्यार्थ्यांना प्लेसमेंट

## एमसीए उत्तीर्णांना ३ लाखांचे वार्षिक पॅकेज

प्रतिनिधी । नाशिक



तीन लाखांचे वार्षिक पॅकेज मिळालेले एमसीए विभागाचे विद्यार्थी

मास्टर ऑफ कॉम्प्युटर अॅप्लिकेशन (एमसीए) या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या १९ विद्यार्थ्यांना गुजरात येथील नारोला इन्फोटेक एलएलपी या कंपनीकडून प्लेसमेंटची संधी मिळाली आहे. निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना ३ लाखांचे वार्षिक पॅकेज मिळाले आहे.

आयटी क्षेत्रासह आता सर्वच क्षेत्रांत माहिती तंत्रज्ञान, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, डाटा सायन्स यांचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे या विषयांतील कौशल्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना नोकरीच्या अनेक संधी प्राप्त होत आहे. के. के. वाघ संस्थेच्या ट्रेनिंग व प्लेसमेंट विभागातर्फे एमसीएच्या विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस इंटरव्ह्यूचे आयोजन करण्यात आले होते. अखेरच्या वर्षात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षण पूर्ण होण्यापूर्वीच नोकरी मिळावी, या उद्देशाने संस्थेमार्फत विविध कंपनीतर्फे कॅम्पस ड्राइव्हचे आयोजन केले जाते. सरासरी ६ टक्के गुण असलेल्या विद्यार्थ्यांना य कॅम्पस ड्राइव्हमध्ये भाग घेण्याच संधी मिळाली.

Divya Marathi, 26-11-2022



नाशिक : नोकरीची संधी मिळालेले के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाचे विद्यार्थी.

# वाघ अभियांत्रिकीच्या १९ विद्यार्थ्यांना नोकरीची संधी

सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. २५ : के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंटमार्फत एम. सी. ए. विभागाच्या १९ विद्यार्थ्यांना नोकरीची सुवर्णसंधी मिळाली आहे. शिकत असतानाच सरासरी तीन लाखांचे पॅकेज मिळाल्याने पालकांनी आनंद व्यक्त केला.

महाविद्यालयात एम. सी. ए विभागाची प्रवेश क्षमता १२० असून त्या विभागाला नुकतेच युजीसीकडून एन. बी. ए. नामांकन प्राप्त झालेले आहे. अखेरच्या वर्षात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षण पूर्ण होण्यापूर्वीच नोकरी मिळावी या उद्देशाने संस्थेमार्फत विविध कंपनीचे कॅम्पस ड्राइव्हचे आयोजन केले जात असते. या पार्श्वभूमीवर गुजरात येथील नारोला इन्फोटेक एल. एल. पी., सुरत या कंपनीने कॅम्पस ड्राइव्ह मध्ये सहभाग नोंदवला.

सरासरी ६० टक्के गुण असलेल्या विद्यार्थ्यांना या कॅम्पस ड्राईव्हमध्ये भाग घेण्याची संधी मिळाली होती. सुरवातीला प्रि -प्लेसमेंट चर्चेद्वारे विद्यार्थ्यांना कंपनीविषयी माहिती, मुलाखतीची प्रक्रिया तसेच पॅकेज आदी बाबतची माहिती देण्यात आली. १९ विद्यार्थ्यांना नोकरीची संधी प्राप्त झाल्याची माहिती ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी. के. शहाबादकर यांनी दिली.

के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात नावीन्यपूर्ण उपक्रम राबवण्यात येणार आहेत, अशी माहिती प्राचार्य डॉ. केशव नांदुरकर यांनी दिली. संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर, विभाग प्रमुख डॉ. वंदना वागल व ट्रेनिंग अँड प्लेसमेंट समन्वयक रुपाली पाटील यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

**Divya Marathi,26-11-2022**

आपलं महानगर | My महानगर.com

# 'के. के. वाघ'मध्ये इंडक्शनची संगीत मैफिलीने सांगता

**नाशिक** । ए.आय.सी.टी.ई. दिल्ली आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या शैक्षणिक आराखड्यानुसार के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन संस्था नाशिक येथे सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात प्रथम वर्ष बी.टेक. मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी शिक्षणाबरोबरच मानवी मूल्ये व जीवनमूल्ये, आरोग्य, समाजाप्रती जबाबदारी यांची जाणीव निर्माण व्हावी या उद्देशाने नोव्हेंबर महिन्यात दहा दिवस इंडक्शन या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यात सुमारे ७०० हून अधिक विद्यार्थी व पालक यांनी सहभाग नोंदविला. या कार्यक्रमाची सांगता झी सारेगमची स्टार सृष्टी पगारे व मानस गोसावी यांच्या संगीत मैफिलीने झाली.

उदघाटन कार्यक्रम प्रसंगी प्राचार्य डॉ.के.एन.नांदुरकर यांनी संस्थेचे माजी अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांच्या स्मृतींना उजाळा दिला. तसेच संस्थेच्या निरंतर



प्रगतीचा इतिहास व त्याचे फलित म्हणून महाविद्यालयाला मिळालेल्या स्वायत्त दर्जाचे महत्व विशद केले. शिक्षणात यशस्वीतेसाठी अभ्यासाबरोबर स्वयंशिस्त आणि सामायिक शिस्त याचे महत्व उपप्राचार्य व प्रशासन विभाग अधिष्ठाता डॉ.एस.एस.साने यांनी विशद केले.

महाविद्यालयातून अत्याधुनिक तंत्रज्ञान यासोबतच जागतिक दर्जाचे विद्यार्थी घडविण्यासाठी राबविले जाणारे उपक्रम आणि त्याची यशस्वी अंमलबजावणी याचा लेखाजोखा विद्यार्थी व्यवहार अधिष्ठाता डॉ.डी.एम.चांदवडकर यांनी मांडला. शैक्षणिक अधिष्ठाता डॉ. सुनील कुटे यांनी स्वायत्त महाविद्यालयाच्या बी.टेक. अभ्यासक्रमाच्या अंमलबजावणी आणि मूल्यमापन पद्धतीबद्दल अवगत केले. अंतर्गत गुणवत्ता विभाग अधिष्ठाता डॉ.पी.डी.भामरे यांनी गुणवत्ता वाढीसाठी अतिरिक्त अभ्यास आणि त्यासाठी ऑनलाईन उपलब्ध असलेले काही कोर्सेस बद्दल तर ट्रेनिंग अँण्ड प्लेसमेंट अधिकारी डॉ.प्रमोद शहाबादकर यांनी प्लेसमेंट बद्दल माहिती दिली. त्यानंतर यशस्वी माजी विद्यार्थ्यांपैकी कनिष्का ठाकूर, तरल पवार, प्राजक्ता सोमाणी, श्रेया दुदाम आदींनी मनोगत व्यक्त केले.

विद्यार्थ्यांच्या समस्यांबाबत समुपदेशक डॉ.प्रतिभा चांडक यांनी संवाद साधला. तसेच दीपाली शिंपी, डॉ. आर.के.मुंजे, प्रा. एस.एस.जोशी, डॉ.के.एस.होळकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ.विलास पाटील यांनी प्रथमवर्ष कामकाजाच्या नियोजनाचा आढावा घेतला तर डॉ.अनुराधा पवार यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन प्रा.सुमन कहांडळ, प्रा. रुपाली उन्हाळे, प्रा.संजय भामरे, प्रा.रामेश्वर तुपके व प्रा. स्वाती पवार यांनी केले.



# वाघ अभियांत्रिकीच्या इंडक्शनची संगीत मैफिलीने सांगता

**नाशिक : प्रतिनिधी**

ए.आय.सी.टी.ई. दिल्ली आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या शैक्षणिक आराखड्यानुसार के के वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन संस्था नाशिक येथे दहा दिवस इंडक्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यात सुमारे ७०० हून अधिक विद्यार्थी व पालक यांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमाची सांगता झी सारेगमची स्टार मुक्ती पगारे व मानस गोसावी यांच्या संगीत मैफिलीने झाली.

उद्घाटन कार्यक्रम प्रसंगी प्राचार्य डॉ.के.एन.नांदुरकर यांनी संस्थेचे माजी अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांच्या स्मृतींना उजाळा दिला. शिक्षणात अभ्यासाबरोबर स्वयंशिस्त आणि सामाजिक शिस्त याचे महत्त्व उपप्राचार्य डॉ.एस.एस.माने यांनी विशद केले. लेखाजोखा विद्यार्थी व्यवहार अधिष्ठाता डॉ.डी.एम.चांदवडकर यांनी मांडला. शैक्षणिक अधिष्ठाता डॉ. सुनील कुटे यांनी स्वायत्त महाविद्यालयाच्या बी.टेक. अभ्यासक्रमाच्या अंमलबजावणी आणि मूल्यमापन पद्धतीबद्दल अवगत केले. अंतर्गत गुणवत्ता विभाग अधिष्ठाता डॉ.पी.डी.भामरे यांनी गुणवत्ता वाढीसाठी अतिरिक्त अभ्यास आणि त्यासाठी ऑनलाईन उपलब्ध असलेले काही कोर्सेस बद्दल तर ट्रेनिंग अँण्ड प्लेसमेंट अधिकारी डॉ.प्रमोद शहाबादकर यांनी प्लेसमेंट बद्दल माहिती दिली. त्यानंतर यशस्वी माजी विद्यार्थ्यांपैकी कनिष्का ठाकूर, तरल पवार, प्राजक्ता सोमाणी, श्रेया दुदाम आदींनी मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांच्या समस्यांबाबत समुपदेशक डॉ.प्रतिभा चांडक यांनी संवाद साधला. तसेच दीपाली शिंदे, डॉ. आर.के.मुंजे, प्रा. एल.एस.जोशी, डॉ.के.एस.तोळावत यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ.बिलाल पाटील यांनी प्रथमवर्ष कामकाजाच्या नियोजनाचा आढावा घेतला तर डॉ.अनुराधा पवार यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन प्रा.सुमन कहांडळ, प्रा. रुपाली उन्हाळे, प्रा.संजय भामरे, प्रा.रामेश्वर लुंके व प्रा. स्वाती पवार यांनी केले. कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, सचिव प्रा. के.एस.बंदी, प्राचार्य डॉ.के.एन.नांदुरकर यांनी अभिनंदन केले.